# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

----------------------------------------------------------------------------------------------------

## स्थायी समिती सभा क्रमांक ४१

----------------------------------------------------------------------------------------------------

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक ०५/१२/२०२५ दुपारी ४-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ४. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ५. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ६. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ७. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| १०. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पा.पु. |
| ११. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य. अभियंता बांधकाम |
| १२. | श्री संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्य अधिकारी |
| १३. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १४. | श्री संजय मोरे | कार्या.अधिक्षक आस्थापना विभाग |
| १५. | श्री चंद्रकांत मोरे | प्र. लेखापाल लेखा विभाग |
| १६. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १७. | श्री पराग ठाकरे | कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग |
| १८. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १९. | श्री कमलेश सोनवणे | सहा.अभियंता, नगररचना |
| २०. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २१. | श्री मुकेश अग्रवाल | मालमत्ता कर अधिक्षक |
| २२. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३. | श्री विश्वंभर दासरवाढ | मनपा शिक्षण मंडळ |
| २४. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २५. | श्री लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २६. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २७. | श्री अनिल भडागे | वाहन विभाग प्रमुख |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६६१ धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या पाचकंदील भागांतील चारही मार्केटचे पुनर्विकास करणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. उपअभियंता धुळे महानगरपालिकेचे चार व्यापारी संकुल सन १९२५ साली बांधलेली आहे. त्यापैकी १ लालबहादुर शास्त्री मार्केट, २ फळमार्केट, ३शिवाजी मार्केट, ४ शंकर मार्केट असे चार मार्केट आहे. हे नादुरुस्त झाल्यामुळे तसेच स्ट्रक्चरल रिपोर्टमध्ये ते दुरुस्ती लायक नाही. त्यामुळे सदरचे मार्केट हे रिनोव्हेशन करणे आवश्यक आहे. याकामी अंदाजपत्रक तयार केलेले आहे. याकामी एकुण ५४ कोटी ११ लाख मात्र खर्च येणार आहे. सदरच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला आहे. सदरचा खर्च मार्केट मधुन येणारे उत्पन्न, येणारी थकीत रक्कम, तसेच सावता माळी मार्केट मधुन येणारे प्रिमीयम यातुन भागविण्यात येणार आहे. आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्त्व सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक याची जागा मालकी तपासली.

मा.उपअभियंता मनपाची आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता जेवढे लोक तेथे व्यवसाय करत आहे, त्यात दुकान गाळे किंवा ओटे असतील तेवढया संख्येचे शॉप/ गाळे तयार होणार आहे का.

मा.उपअभियंता त्यापेक्षा जास्त संख्येने शॉप असणार आहे. जेवढे धारक आहे त्यांना देवुनच ई ऑक्शन करु.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात जागेवरील जे लोक आहेत, दुकान गाळे, ओटेवाले त्यांना नविन मध्ये समाविष्ट करावे. त्यातील कोणी विस्थापीत होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच बांधकाम करतेवेळी पर्यायी व्यवस्था कोठे केली आहे.

मा.उपअभियंता पर्यायी व्यवस्था जेलरोड येथे करु शकतो तसेच मनपाच्या बाजुला मातृसेवा संघाची शाळा आहे तेथे करु शकतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात सुचना अशी की, रिव्हाईज बजेटमध्ये लेखा शिर्ष तयार करावे. आणि डिपॉझिट बेसिस हे कामे घ्यावे. जे शॉपिंग कॉम्प्लेक्समधुन जी रक्कम येईल ते त्या अकाऊंटला जमा दिसले पाहिजे. तीन वर्षामध्ये जे डिपॉझिट जमा होईल किंवा दुकान गाळयापासुनउत्पन्न व हस्तांतरणाचे उत्पन्न त्यातुनच त्या कामाची परतफेड होईल. पुढील ३ बजेटमध्ये ते गृहीत धरावे. पुर्ण मनपा निधी किंवा डिपॉझिट बेसिस वर डिपेंड राहु नका. शासनाच्या ज्या काही योजना असतील त्यातुनही निधी मागणीसाठी प्रयत्न करावे. तसेच यात मा. न्यायालयाचे आदेश असतील ते तपासुन पहावे. न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन होता कामा नये. चारही प्रॉपर्टी कार्ड पाहुन घ्या. त्याचे अपडेट असलेले प्रॉपर्टी उतारे मागवा. नकाशे टाऊन प्लॅनिंग विभागाकडुन तपासुन मंजुर असावे. यात चारही कॉम्प्लेक्सचा खर्च मोठा दिसतोय. तुमचे प्रॉपर फाईलमध्ये जस्टीफिकेशन दिसले पाहिजे. जेणेकरुन ऑडीटमध्ये अडचण येता कामा नये. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६३९ दिनांक ०५/१२/२०२५**

धुळे महानगरपालिकेचे खालीलप्रमाणे चार व्यापारी संकुल सन १९२५ मध्ये बांधलेली आहेत.

| अ.क्र. | सि.स.नं. | मार्केटचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १) | ३०४९/३०५० नवीन २९२७ | लालबहादूर शास्त्री मार्केट भाजी मार्केट | १४५७.२५ चौ.मी |
| २) | ३०५२ | फळ मार्केट | ९५२.३० चौ.मी |
| ३) | ३०५१ | शिवाजी मार्केट (कापड दुकान) | १२५६.७० चौ.मी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | २९१३ | संकर मार्केट (कापड मार्केट/धान्य मार्केट) | १४४५.७० चौ.मी |
| | | **एकूण** | **५१११.९५ चौ.मी** |

उक्त चारही मार्केटचे पुर्नविकास करणेस मे.प्रशासकीय महासभा ठराव नंबर २८ दि.१९/११/२०२५ नुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून पाचकंदील भागांतील सि.स.नं.२९२७ लालबहादूर शास्त्री भाजीपाला मार्केट व सि.स.नं.२९१३ शंकर मार्केट ह्या दोन व्यापारी संकुलासाठी रक्कम रु.३१,९३,६४,६२६/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच सि.स.नं.३०५२ फळ मार्केट व सि.स.नं.३०५१ छत्रपती शिवाजी मार्केट ह्या दोन व्यापारी संकुलासाठी रक्कम रु.२२,१७,६१,९७४/- मात्र खर्च अपेक्षित आहे. चारही मार्केट साठी एकूण रक्कम रु.५४,११,२६,६००/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

उक्त बाबत मनपास भविष्यात संबंधित अस्तित्वातील भाडेकरु यांच्याकडील थकीत रक्कम, पुर्नविकासासाठी ई ऑक्शन द्वारे येणारी प्रिमिअम रक्कम, दसेरा मैदान, नवरंग जलकुंभ, सावता माळी मार्केट, येथील प्रस्तावित संकुलांमधून मिळणारे प्रिमिअम रक्कम व इतर अनुषंगिक अंदाजे उत्पन्न **८२.२७ कोटी** प्राप्त होणार आहे.

सदर पाचकंदील भागांतील चारही मार्केट साठी एकूण रक्कम रु.५४,११,२६,६००/- मात्रचा खर्च हा वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार मनपास प्राप्त होणाऱ्या अंदाजित उत्पन्नातून करण्यात येणार आहे. सदर कामावरील खर्च २५ लक्ष पेक्षा जास्तीचा असल्याने सदरचा विषय आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या पाचकंदील भागांतील चारही मार्केटचे पुर्नविकास करणेकामी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

पुढील ३ वर्षातील कामाच्या टप्प्यानुसार सदर कामासाठी अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात यावी. प्रस्तावित व्यापारी संकुलातील प्राप्त होणाऱ्या भाडे, प्रिमिअम रक्कम, हस्तांतरण फी, थकीत भाडे इत्यादी बाबींमधून प्राप्त होणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून सदर बांधकामाच्या खर्चाची तरतूद करावी. सदर व्यापारी संकुल निर्माणाधीन काळात तेथील सद्यस्थितीत अस्तित्वातील दुकानदारांना जेलरोड, मातृसेवा संघ शाळेजवळील रस्ता, शाळा नं.४/८ शाळा नं ५ व शाळा नं. ६ मधील मोकळया जागेत तथा मनपा निश्चीत करेल अशा ठिकाणी पर्यायी व्यवस्था करणेबाबत कार्यवाही करावी तसेच सदर बाबतीत मे. न्यायालयाच्या आदेशाची उल्लंघन होणार नाही याबाबत विभागाने दक्षता घ्यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६२ धुळे मनपा मालकीचे फायनल प्लॉट नं. १५३ येथे आयुक्त निवास बांधणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक जागा मालकी कोणाची तसेच नगररचनेकडुन प्लॅन तपासला आहे.

मा.उपअभियंता मनपा मालकीची जागा आहे व नगररचना विभागाकडुन प्लॅन तपासण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता अस्तित्वातील निवासस्थानाचे वय किती आहे.

मा.उपअभियंता धुळे मनपाची स्थापना २००३ साली झाली आहे. त्या आधीपण प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी धुळे शहरात कुठलेही निवासस्थान नव्हते. मयुर कॉलनीत आऊट हाऊस आहे. अस्तित्वातील निवासस्थानाचे लाईफ संपले आहे. त्याअनुषंगाने सदरचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक मान्य. आता मनपातील अधिकारी कर्मचारी यांचेसाठी निवासस्थान आहे का.

मा.उपअभियंता अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्याची स्थिती कशी आहे.

मा.उपअभियंता आता नविनच बांधले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सफाई कर्मचारी यांचेसाठी निवासस्थान आहेत का.

मा.उपअभियंता आहेत पण खुप जुने आहे. ते त्यांच्या नावावर केले आहे, त्याचा मेंटेनन्स ते स्वत: करतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४० दिनांक ०५/१२/२०२५**

धुळे महानगरपालिका निधी सन २०२५-२६ अंतर्गत धुळे महानगरपालिका मालकीचे फायनल प्लॉट नं.१५३ येथे निवासस्थान बांधणे या कामास धुळे म.आयुक्त सो यांनी जा.क्र./धुमपा.बां.वि./७१/२०२५-२६ दि.२१/११/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ७८,१८,३५६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्र./२३७/२०२५-२६ दि.२१/११/२०२५ अन्वये रक्कम रु. ७८,१८,३५६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **गायत्री कन्सट्रक्शन** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | दिपेश सुभाषकुमार ललवाणी | शे.४.००% जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.गायत्री कन्सट्रक्शन, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ७८,१८,३५६/- इतक्या रक्कमेचे असून शे.अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे. गायत्री कन्सट्रक्शन, धुळे यांचे दर शे.अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे. गायत्री कन्सट्रक्शन, धुळे यांची **शे.**अंदाजपत्रकीय दराने दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे.स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा मालकीचे फायनल प्लॉट नं. १५३ येथे आयुक्त निवास बांधणेकामी आलेल्या मे.गायत्री कन्सट्रक्शन, धुळे यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६३ धुळे महानगरपालिके चे १२ अॅलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्र (एकुण १७ दवाखाने) यासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी औषधे खरेदीसाठी ई निविदेत आलेले दर मान्यतेसाठी फेरसादर झालेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा विषय माझ्याकडे आला होता. त्यात निगोसिएशन होवुन बऱ्यापैकी दर खाली आहे आहेत. शासन नियमानुसार अधिकचे दर देता येत नाही.

मा.प्र.वैद्यकीय अधिकारी उक्त खर्च अंदाजीत खर्चापेक्षा रु. ३१,०९७५८/- मात्रने कमी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यापुढे सर्व विभाग प्रमुखांनी हे लक्षात घ्यावे की जर डीएसआर किंवा बेस रेट नसेल तर आशा वेळेस आपण मागील रेट धरतो अशावेळी प्रॉपर कम्प्यारीझन करावे. आणि कुठलेही काम जास्तीत जास्त मागील मंजुर दरापेक्षा किंवा शासन दरापेक्षा १० टकके अधिक घेता येते. त्याच्यावर जाता येत नाही. काही कामाच्या स्वरुपात वाढ करावी लागते तर हे सुध्दा १० टक्के च्या मर्यादेतच करावे लागते. जर जास्त करायची वेळ आली तर सुधारीत प्रोसेस राबवावी. १० टक्केपेक्षा अधिक दर जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

मा. मु.ले.प. सध्या औषधांच्या बाबतीत ऑडीट चालु आहे. औषधे खरेदी करतांना जे दर येतात आपल्याकडे त्याचे कंपनी नेम कॉलमअसतो. त्या ठिकाणी जेनेरीक ऐवजी स्टॅण्डर्ड पण नंतर तो पुरवठादार आपल्याला काय देणार हे कुठे तपासले जाते. यात ते त्याच्याकडुन व्हेरीफाय करावे. आपल्याकडे जे मेडीसीन येतात ते अॅप्रुव्हड मेडीसीन असावे याची खात्री करावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात एक महत्वाची सुचना आहे की तुम्ही पुरवठादाराला वर्क ऑर्डर देणार यात गरजेनुसार खरेदी करावी. एक्सपायरी डेट जवळ आली तर विल्हेवाट लावणे अवघड होते. गरजेनुसारच औषध खरेदी झाली पाहिजे. टप्प्याटप्प्याने औषध खरेदी करावी. लेखा परिक्षक सो. यांनी दिलेल्या सुचनांची दखल घ्यावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४१ दिनांक ०५/१२/२०२५**

सन २०२५-२६ या वर्षाकरिता धुळे महानगरपालिका आरोग्यविभागाकडील १२ अॅलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ नागरी आरोग्य़ केद्र, १ कुटुंब कल्याण केंद्रासाठी स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा सुचना क्रं.४१ No. Tender I.D. २०२५_DMCD_११९३९५७_१ नुसार दर मागविण्यात आले आहेत. मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांनी दि.२७/११/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशनुसार वाटाघाटी नंतर कमी आलेल्या निविदाधारकांचे दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नावे | औषधे | एकुण |
|---|---|---|---|
| १) | देव फार्मा, पुणे. | २८ प्रकारचे औषधी | रू.७,४५,५४६/- |
| २) | गगन फार्मा. मुंबई. | २६ प्रकारचे औषधी | रू.१४,०२,८८४/- |
| ३) | मे.प्राईम सेल्स, धुळे. | १४ प्रकारचे औषधी | रू.२,९४,९४५/- |
| ४) | मे.रेणुका सेल्स, चंद्रपुर | ३७ प्रकारचे औषधी | रू.६,५९,२३९/- |
| | | १०३ प्रकारचे औषधे खरेदीसाठी एकुण खर्च | रु.३१,०२,६१४/- |

सबब धुळे महानगरपलिकेस ई-मेलव्दारे प्राप्त झालेल्या (०८ प्रकारचे) वाटाघाटीनंतर कमी आलेल्या दरांप्रमाणे तुलनात्मक दरांचा तक्ता प्रस्तावात नमूद आहे. त्यानुसार आलेल्या ॲलापॅथी औषधसाठी खर्च रु.३१,०२,६१४/- मात्र येणार आहे. उक्त खर्च अंदाजीत खर्च पेक्षा रु.३१,०९,७५८/- मात्रने कमी येणार आहे. (५०.०५% ने कमी) आहे.

सबब, सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी तुलनात्मक कमी असलेल्या ई-निविदा प्रणालीव्दारे आलेल्या व ०८ प्रकारचे वाटाघाटीनंतर कमी आलेल्या दरांप्रमाणे १०३ प्रकारचे औषध खरेदीसाठी खर्च रु.३१,०२,६१४/- मात्र येणार आहे. उक्त खर्चास व तुलनात्मक कमी असलेल्या दरांप्रमाने खरेदीसाठी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे फेरसादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेचे १२ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्र (एकुण १७ दवाखाने) यासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी औषधे खरेदीसाठी वाटाघाटी अंती प्रस्तावात नमूद अनु क्र. १ ते ४ निविदा धारकांचे आलेल्या दरास मान्यता देणेत येत आहे.

सदर औषधी सक्षम मान्यता प्राप्त संस्थेकडून प्रमाणित करुन घेण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने औषधी खरेदी बाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६६४ धुळे शहरातील खड्डे बुजवणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — मनपा हददीत अंतर्गत रस्त्यांवरील खडडे बुजविणेकामी उक्त कामाच्या खर्च रक्कम ४० लक्ष मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. उक्त कामी निविदा मागविण्यात येवुन त्यात ३ ठेकेदारांनी भाग घेतला होता. त्यात गायत्री कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दर आले आहे. दरास मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक — बजेट प्रोव्हीजन किती आहे व शिल्लक किती.

मा.उपअभियंता — १ कोटी व शिल्लक ६० लक्ष आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात थोडे अंतर्गत रस्ते देखील घ्यावे. बऱ्याच ठिकाणी रस्ते खराब आहे. अजुन एखादी निविदा करावी. रोडच्या बाबतीत ज्या मी मागे सुचना दिल्या त्या फॉलो कराव्या. तसेच रोडच्या लेव्हल मॉनिटरींग करा. जुन्या रस्त्याची व नविन रस्त्याची लेव्हलचा फरक जस्टीफाय करता आला पाहिजे. रस्ते व मनपाची कामे यात गुणवत्तेमध्ये तडजोड नसावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६४२ दिनांक ०५/१२/२०२५**

मनपा हद्दीत अंतर्गत रस्तेवरील खड्डे बुजवणे कामास ०३/०१/२०२५ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४०,००,०३२/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./५७८/२०२४-२५ दिनांक ०३/०१/२०२५ अन्वये रक्कम रु. ४०,००,०३२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| व १ | गायत्री कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने | सर्वात कमी दर |
| री २ | एकवीरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ल ३ | रामेश्वर ट्रेडर्स | शे.४.००% जास्तीने | |

प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून गायत्री कन्सट्रक्शन, धुळे यांचे दर **अंदाजपत्रकिय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **मे. गायत्री कन्सट्रक्शन, धुळे** यांची **अंदाजपत्रकिय दराने** आलेले निविदा दर मंजुरी कामी मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांच्या कडेस कामी मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे शहरातील खड्डे बुजवणेकामी आलेल्या गायत्री कन्सट्रक्शन, धुळे यांच्या अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

या प्रस्तावाच्या अनुषंगाने शहरातील अंतर्गत रस्तांवरील खड्डे बुजवणे कामीही कार्यवाही करावी. तसेच खड्डे बुजवणेचे काम गुणवत्तापूर्वक होईल याची दक्षता घ्यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**मे. स्थायी समिती बैठकी प्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले निर्देश**

१)उद्यापासुन अधिवेशन सुरु होते आहे. या कालावधीत कोणीही रजा घेवु नये. शासनाचे अधिकारी यांनी मुख्यालयातच थांबावे. याकालवधीत महत्वाची मागविली जाते.ती तात्काळ देणे गरजेचे असते.

२)मतदार याद्या अंतिम करण्याचे काम सुरु आहे. उपायुक्त नागपुर येथे जात आहेत. अति. आयुक्त यांनी ते काम ताब्यात घ्यावे. फिल्डवरील यंत्रणा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे काम करत आहे का ते पहावे. आलेल्या प्रत्येक तक्रारींची आपल्याला दखल घ्यावी लागेल.

३)सहा अध्किाऱ्यांना फिल्डवर क्रॉस व्हेरिफिकेशनसाठी नेमले आहे. तर त्यांनी व्हिजीट सुरु कराव्या. प्रत्यक्षात कर्मचारी फिल्डवर पोहोचला की नाही याबाबत नागरीकांशी चर्चा करा. आणि काम योग्य रितीने होते का हे पहावे. कोठे कोठे व्हिजीट केल्या त्याचे रेकॉर्ड मेंटेन करावे. निवडणूक आयोगाला कंट्रोल चार्ट अपलोड करायचा आहे. दबावाखाली नावे या प्रभागातुन त्या प्रभागात जाणार नाही याची दक्षता घ्यावी. दुबारमध्ये जेवढया केसेस आयडेंटीफाय होतात त्या आयडेंटीफाय करण्याचा प्रयत्न करा. तसेच बीएलओ यांना कामाला लावावे.

४)सुडके सो. टाऊन प्लॅनिंग व बांधकाम इंजिनियर यांना मदतीला घ्यावे. गाळे मोजणी करुन घ्यावी. आपण दुकान गाळयांना शुल्क व दंड केले ते कमी होती. तसेच घरपटटी कमी होईल. आपण जे सुधारीत दर केले त्यानुसार नेमके किती भाडे भरणे अपेक्षीत आहे व त्यानुसार किती दंड होतोय व त्यानुसार घरपटटी किती आकारली पाहिजे. हे आकडे कन्फर्म नसल्यामुळे व्यापारी देखील कन्फयुज आहे. ते कन्फयुजन दुर करावे लागेल. हमीपत्राचे नमुने माझ्याकडे बसुन फायनल करावे. सावता माळी मार्केटमध्ये जे पैसे भरतील त्यांचे शॉप ताब्यात घेवुन त्यांनी पर्यायी जागा माझ्या सहिने ॲलॉट करुन आणि डिमॉलिश करण्यास सुरुवात करावी. १० तारखेनंतर डिमॉलिशनची तयारी करावी.

५)मनपा निवडणूक कधीही लागु शकते. त्यासाठी निवडणूक व्यवस्थीत पार पाडावी म्हणुन ज्या ज्या निविदा प्रक्रिया करायच्या आहे. जर केल्या नसतील तर तात्काळ कराव्या.

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**